**मराठी भाषा विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकरीता ऐरोली, नवी मुंबई येथे "मराठी भाषा भवन उपकेंद्र" या इमारतीच्या बांधकामासाठी अतिरिक्त १०१८.७२ चौ.मी. जागा दीर्घकालीन भाडेपट्टीने संपादित करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## मराठी भाषा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः मभाभ-२०१६/प्र.क्र.१२८/भाषा-१, (भाग-२)**

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २४ जुलै, २०१९

**वाचा :-**

१) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : मभाभ-२०१६/प्र.क्र.१२८/भाषा-१, (भाग-२), दि.०५.०३.२०१८.
२) सिडको महामंडळाचे पत्र क्र. सिडको/सासेवि/२०१९/८३३, दि.१७.०६.२०१९.
३) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : मभाभ-२०१८/प्र.क्र.६३/भाषा-१, दि.०६.०७.२०१९.

**प्रस्तावना :-**

मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील कार्यान्वित असलेली १) भाषा संचालनालय, २) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ३) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व ४) राज्य मराठी विकास संस्था ही क्षेत्रीय कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यरत आहेत. सदर कार्यालयांमार्फत भाषा व साहित्य विकास विषयक विविध उपक्रम राबविण्यात येतात. या सर्व कार्यालयांच्या कामात समन्वय राहावा या दृष्टीने ही कार्यालये एकाच इमारतीत असावी या उद्देशाने शासनाकडून सिडको महामंडळाकडे जागेची मागणी करण्यात आली होती. त्यानुषंगाने सिडको

महामंडळाने ऐरोली, नवी मुंबई येथील सेक्टर क्र. १३ मधील भूखंड क्र. ६-अ हा भूखंड (अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ. मी.) "मराठी भाषा भवन उपकेंद्र" या इमारतीकरीता वितरित करण्यास सहमती दिली. सदर भूखंडावर "मराठी भाषा भवन उपकेंद्र" या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

२. सिडको महामंडळाने ऐरोली येथील भूखंड क्र. ६ अ, अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ.मी., सेक्टर १३, या भूखंडाचे दीर्घकालीन भाडेपट्टीच्या अनुषंगाने विहीत केलेले एकूण शुल्क रू.३,६३,५०,१९०/- (अक्षरी रूपये तीन कोटी त्रेसष्ठ लाख पन्नास हजार एकशे नव्वद फक्त) सिडको महामंडळाला अदा केले आहेत.

३. मराठी भाषा भवन उपकेंद्रासाठी वाटप केलेल्या २००० चौ.मी. भूखंडापैकी १००० चौ.मी. क्षेत्रफळ हे किनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०११ (CRZ Notification, २०११) अन्वये CRZ-II (Urban) प्रकारामध्ये आणि ५० मीटर खारफुटी क्षेत्रात बाधीत होत असल्याने या जागेवर प्रचलित धोरणानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बांधकाम करता येत नसल्याचे सिडको महामंडळाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले. त्या अनुषंगाने इमारत बांधकामासाठी अत्यावश्यक भूखंडाकरीता सिडको महामंडळाने मूळ भूखंडालगत अतिरिक्त १०१८.७२ चौ.मी. क्षेत्र वाटपासाठी प्रस्तावित केले आहे. इमारत बांधकामासाठी अतिरिक्त भूखंडाची आवश्यकता असल्याने मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या मूळ प्रस्तावातील ह्या बदलास महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १५ अन्वये शासन कामकाजासंबंधीच्या देण्यात आलेल्या अनुदेश क्र.२९ नुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून सदर प्रस्तावास मान्यता घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय</u> :-

मराठी भाषा भवन उपकेंद्रासाठी ऐरोली, नवी मुंबई येथील भूखंड क्र. ६-अ, सेक्टर क्र.१३ मधील एकूण १०१८.७२ चौ.मी. अतिरिक्त भूखंड दीर्घकालीन भाडेपट्टीने संपादित करण्यास तसेच सदर भूखंडाच्या भाडेपट्टीचे एकूण शुल्क रू.२,०६,२१,५००/- (अक्षरी रूपये दोन कोटी सहा लाख एकवीस हजार पाचशे फक्त) अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. भूखंडाच्या भाडेपट्टीपोटी येणारा वरील खर्च, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राकरीता विभागाच्या मागणी क्रमांक झेडएफ-४, मुख्य लेखाशीर्ष ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, (०१), कार्यालयीन इमारती, (०५१) बांधकाम, (००) (०१) मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे (कार्यक्रम), ५३ मोठी बांधकामे, (४०५९ २५३२) अंतर्गत केलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर प्रस्तावास वित्त विभाग व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनुक्रमे २२५/२०१९/व्यय-४, दि.२७.०६.२०१९ व ११०/का.१४४३, दि.११.०७.२०१९ नुसार सहमती दिली आहे. तसेच सदर प्रस्तावास शासन कार्यनियमावलीच्या नियम क्र.१५ मधील अनुदेश क्र.२९ च्या तरतूदीनुसार शासन मान्यता घेण्यात आली आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२४१६२०५२०८३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=240bdeb5a8c04b434248c583b5e7f565fb8f4397eae617484fa00c420b9d8820, serialNumber=5ae0b19673d867bcfdc05241567418b685d610981279f68b2794bfec2066774a, cn=Aparna Arvind Gawde
Date: 2019.07.24 16:26:32 +05'30'

**( अपर्णा अ. गावडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१ मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल भवन, मुंबई,
२ मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३ मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४ मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५ मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा, विधान भवन, मुंबई,
६ मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,
७ महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
८ महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर,
९ प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
१० प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
११ प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
१२ व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), मुंबई
१३ अपर मुख्य सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई,
१४ प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१५ सचिव (इमारती), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६ सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),

१७ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१९ भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२० सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई
२१ सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२२ संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२३ सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२४ निवड नस्ती (भाषा - १).